पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका/११/कावि/ ३११ /२०१४
दिनांक : ११ /१२ /२०१४

प्रति,
मा. - - - - - - - - - - - - - - - - - - - - -
सदस्य/ सदस्या, अ प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी, पुणे-४११०४४

विषय: पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची सभा
बुधवार दिनांक १७/१२/२०१४ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.अ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १७/१२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील ' राजमाता जिजाऊ सभागृह ' येथे आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपली विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

अ प्रभाग समिती

**कार्यपत्रिका क्रमांक ९**

दिनांक: १७/१२/२०१४ वेळ: दुपारी १२.०० वाजता

---

पिंपरी चिंचवड महानगर पालिका अ प्रभाग समितीची माहे डिसेंबर ची मासिक सभा बुधवार दिनांक १७/१२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील ' राजमाता जिजाऊ सभागृह ' येथे आयोजित करणेत आली आहे. सदर सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) दिनांक ०८/१०/२०१४ रोजी तहकुब करणेत आलेल्या व दिनांक १२/११/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे ऑक्टोबर २०१४ चे मासिक सभेचा सभात्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र. ७) कायम करणे.

ब) दिनांक १२/११/२०१४ रोजी घेणेत आलेल्या माहे नोव्हेंबर २०१४ चे मासिक सभेचा सभात्तांत (कार्यक्रम पत्रिका क्र. ८) कायम करणे.

विषय क्र.१ मा.क्षेत्रीय अधिकारी यांचे पत्र दिनांक ०९/१२/२०१४

भक्ती-शक्ती चौक निगडी ते मुकाई चौक किवळे हा ४५ मिटर रस्ता विकसित करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. रेल्वे उड्डाणपूल ते भक्ती-शक्ती चौक पर्यंतचा रस्ता विकसित करण्याचे काम निविदा नोटीस क्रमांक १०/१-२०१४-१५ अन्वये ठेकेदारास दिलेले असून प्रत्यक्ष कामास सुरुवात करणेत येणार आहे. या कामांतर्गत चेनेज ४३०० अप्पू घर नजिक महापालिका कर्मचारी निवास स्थानाची (३७०.७४चौ.मि.क्षेत्रफळाची) एकूण आठ सदनिका असलेली इमारत रस्तारूंदीने बाधीत होत आहे. सदर इमारतीमध्ये एकुण ७ कर्मचारी राहत असून १ सदनिका रिकामी आहे. इमारतीमधील कमचा-यांची निवास व्यवस्था व स्थलांतरण इ.बाबत मा.सहा.आयुक्त, भूमि-जिंदगी यांचेमार्फत कार्यवाही करण्यात येणार आहे.

रेल्वे उड्डुणपूल ते भक्ती-शक्ती चौक पर्यंतचा रस्ता विकसित करण्याचे काम सूरु करणेकामी रस्ता रूंदीकरणाने बाधीत होत असलेली सदरची मनपा कर्मचारी निवासस्थानाची इमारत पाडणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-४४
अक्षेका /११/कावि/ ३११ /२०१४
दिनांक : ११ /१२/२०१४